मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

जा.क्र.मुंमप्र.झोपुप्रा/परिपत्रक/उजि-१/कावि/७८४/२०२५
दिनांक :- 20 FEB 2025

# परिपत्रक

**विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे परिशिष्ट — II मध्ये पति-पत्नी यांचे संयुक्त नावाची नोंद घेणेबाबत...**

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.एस-१४/२१६१८६/प्र.क्र.४५८/ल-६ दि. १५/०९/१९९२
२. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एलसीएस ०६०६/प्र.क्र.५४/ज-१ दि. २५/०५/२००७
३. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१ दि. १६/०५/२०२२
४. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.झेडपीए-२०२१/प्र.क्र.३५/पंरा-१ दि. ०२/०५/२०२२

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील तरतुदींनुसार दि.०१/०१/२००० हा संरक्षण पात्र दिनांक विचारात घेऊन संरक्षण पात्र झोपडीचे अस्तित्व व त्यात राहणाऱ्या झोपडीधारकांचे वास्तव्य सिध्द करण्याच्या अनुषंगाने संदर्भाकित शासन निर्णय दि. १६/०५/२०१५ नुसार कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे तद्नंतर संदर्भाकित शासन निर्णय दि. १६/०५/२०१५ अन्वये "सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे" या अभियानांतर्गत राज्यातील नागरी क्षेत्रासाठी दि.०१/०१/२००० नंतर परंतु दि.०१/०१/२०११ रोजी अथवा त्यापुर्वी अस्तित्वात असलेल्या झोपडीचा संदर्भात सध्या प्रत्यक्ष राहत असलेले निवासी/अनिवासी/संयुक्त किंवा तिन्ही प्रकारातील झोपडीधारक पती अथवा पत्नी यांचे नाव परिशिष्ट - II मध्ये समाविष्ट करणेचे धोरण शासनाने अंगीकारले आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, २०११ आणि महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, २०१४ च्या तरतुदीनुसार दिनांक ०१/०१/२००० या अर्हता दिनांक रोजी अथवा त्यापुर्वी अस्तित्वात असलेल्या शासकीय, निमशासकीय व खाजगी जमिनीवरील घोषीत तसेच गणनाकृत झोपडीत सध्या प्रत्यक्ष रहात असलेल्या झोपडीवासियाचा निवारा संरक्षित करण्यात आला आहे.

ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, मानपाडा, ठाणे (पश्चिम) - ४०० ६१०.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२५८४३९०० / ईमेल : thane@sra.gov.in

त्याअनुषंगाने सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक १६/०५/२०१५, १६/०५/२०१८ अन्वये निर्गमित झालेल्या दि.०१/०१/२००० अथवा त्यापुर्वीपासून सलग वास्तव्यस असणाऱ्या झोपडीधारक यांना जोडपत्र तीन व झोपडी हस्तांतरण झाली असल्यास सध्या वास्तव्यास असलेले झोपडीधारक जोडपत्र चार सोबत स्वयंघोषणापत्र प्रपत्र अ व प्रपत्र ब सादर करतात. तद्नंतर शासकीय, निमशाकीय व खाजगी जमिनीवरील घोषीत तसेच गनणाकृत झोपडीत प्रत्यक्षात वास्तव्यास असणाऱ्या झोपडीधारकाचे पती/पत्नी यांचे पुरावे पडताळणीअंती त्यांचे नाव परिशिष्ट - II मध्ये दाखल करण्यात येते.

महिलांमध्ये सुरक्षिततेतची भावना निर्माण होण्यासाठी त्यांना पतीच्या मालमत्तेमध्ये हक्क देणे ही मुलभूत गरज आहे. भारतीय संस्कृतीमध्ये पती-पत्नी यांना एकरूप एक घटक मानला जातो व प्राप्त संपत्ती दोघांची असल्याचे मानले जाते. त्यामुळे स्त्रियांचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी त्यांच्या राहत्या घराची नोंद पती - पत्नी दोघांच्या नावे असणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा पतीच्या निधनानंतर पतीच्या मालमत्तेमध्ये हक्क प्रस्थापित करताना महिलांना अनेक कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागते. जर आधीच पति-पत्नीचे हक्क झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या परिशिष्ट - II मध्ये असेल तर अशा अडचणी येणार नाहीत. यासाठी सुरूवात म्हणून पति आणि पत्नीच्या संयुक्ता नावे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या परिशिष्ट -II मध्ये नोंदणी करण्यासाठी महाराष्ट्र महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक १५-०९-१९९२, २५/०५/२००७, १६/०५/२०१५ या धर्तीवर पतीच्या मालमत्तेमध्ये पत्नीच्या कायदेशीर हक्कासाठी परिशिष्ट - II मध्ये संयुक्तरित्या नाव असणे गरजेचे आहे.

Unified Development Control and Promotion Regulations For Maharasthra State, २०२० मधील तरतुद १४.७.३. मध्ये नमुद असल्याप्रमाणे “ The reconstructed tenement shall be of the ownership of the hutment dweller and spouse conjointly, and shall be so entered and be deemed to be so entered in the records of the cooperative housing society, including the share certificates or all other relevant documnents. ” वरील बाबी विचारत घेता झोपडपट्टी पुनर्वसन योजनेनुसार परिशिष्ट - II पारित करताना पती-पत्नी यांचे संयुक्ता असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने परिशिष्ट - II मध्ये पती-पत्नी यांचे संयुक्त नावाची नोंद होणेकरिता खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

१. सक्षम प्राधिकारी यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे परिशिष्ट - II निर्गमित करताना पती - पत्नी यांचे संयुक्त नावाची नोंद घेण्यात येऊन परिशिष्ट -II निर्गमित करावे.

२. परिशिष्ट - II प्रमाणे मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पुनर्वसन इमारतीमध्ये सदनिका वितरीत करतेवेळी सदनिका वाटपपत्रावर पती - पत्नी दोघांचे नाव नोंद करुन सदनिका वितरीत करण्यात यावी.

३. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांनी पुनर्वसन योजनेतील सर्व सहकारी गृहनिमार्ण संस्थेस सदनिकाधारकांना भाग दाखला तसेच सदस्यत्व देतेवेळी पती/पत्नीसह " **संयुक्त सभासद** " **(Joint Member)** म्हणून नोंद घेणेबाबत तसेच संस्थचे समभाग संयूक्तरित्या दोन्ही सभासदांचे नावे नोंदविणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

वरील परिपत्रकीय सूचनेनुसार प्राधिकरणातील संबंधित विभागानी कार्यवाही करावी. तसेच पुनर्वसन योजनेतील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थानी नोंद घेऊन तशी अंमलबजावणी करावी.

मुंमप्र. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**(पराग सोमण) भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मुंबई महानगर प्रदेश**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे**